# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.२६/१२/२०१९ए.टी.एम. फोडणाऱ्या टोळीकडून २ ए.टी.एम चोरी, १ घरफोडी चोरी असे एकुण ३ गुन्हे उघड

## विशेष तपास पथकची कारवाई पिंपरी चिंचवडची कामगिरी

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तलायाचे कार्यक्षेत्रामध्ये ए.टी.एम. चोरीचे गुन्हे घडत असल्याने गुन्हयास आळा बसण्याच्या दृष्टीने नाकाबंदी, रात्रगस्त, संशयीत वाहने चेक करणे असे अनेक वेळा आयोजन करण्यात आले होते व अशा गुन्ह्यांना प्रतिंबध व्हावा या दृष्टीने **पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई सा०** यांनी घडलेल्या गुन्ह्यांची लवकरात लवकर उकल व्हावी यासाठी सह पोलीस आयुक्त प्रकाश मुत्याल, अपर पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त सुधिर हिरेमठ, यांचे मार्गदर्शनाखाली व सहायक पोलीस आयुक्त श्री आर.आर. पाटील व श्रीधर जाधव यांचे देखरेखी खाली **एस.आय.टी. (विशेष तपास पथक) या पथकाची** स्थापना करण्यात आली. सदर पथकामध्ये गुन्हे शाखा, युनिट १ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे (पथक प्रमुख), युनिट ३ कडील सपोनि सतिश कांबळे, युनिट ४ कडील सपोनि गोमारे, चाकण पो.स्टे. कडील पोउनि जगदाळे तसेच गुन्हे शाखा व पोलीस ठाणेकडील ११ कर्मचारी यांची नेमणुक करण्यात आली होती.

त्यानुसार एस.आय.टी. पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयामध्ये घडलेल्या सर्व ए.टी.एम चोरीच्या गुन्ह्याची बारकाईने आभ्यास करून अनेक बाहेरील राज्यामध्ये घडलेल्या गुन्ह्या बाबत तसेच त्यामध्ये अटक झालेल्या आरोंपी माहिती घेवुन तपास सुरू करण्यात आला. पर राज्यातील गुन्ह्याची माहिती व गुन्ह्याचा प्रकार याची माहिती घेवुन तसेच तांत्रिक विश्लेषणावर भर देवुन तपास करण्यात आला होता. दरम्यान आळेफाटा येथे दरोड्याच तयारीत असलेल्या आरोपी (१) **अभिजीत उर्फ निकेतन गोकुळ साळवे वय २२ वर्षे रा. हरि निवास बिल्डींग फ्लॅट नं. १२ जिल्हा नाशिक (२) राहुल भगवान साळवे वय २४ वर्षे रा. नाशिक, द्वारका, जि. नाशिक (३) अरुण ज्ञानेश्वर भांगरे वय २४ वर्षे रा. संगमनेर जि. अहमदनगर (४) सागर अनिल दैवज्ञ वय २५ वर्षे रा. पारनेर, जि. अहमदनगर** या चार इसमांना आळेफाटा पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे अटक करण्यात आली होती. आरोपींची गुन्हा करण्याची पध्दत पाहता ती चिखली पोलीस स्टेशन येथे घडलेल्या गुन्ह्याशी मिळती जुळती असल्याने आरोपी हे न्यायालयीन कोठडीत असताना त्यांना वर्ग करून घेवुन चिखली पोलीस ठणे कडील ए.टी.एम. फोडीच्या गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली. त्यांची पोलीस कस्टडी रिमांड घेवुन त्यांचेकडे वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली तपास करता त्यांनी त्र्यंकबेश्रर रोडला बाबा महाराज, नाशिक यांचे मठात घरफोडी चोरी केल्याचे तसेच **उत्तमनगर नाशिक येथे आय.सी.आय.सी.आय बँकचे ए.टी.एम.** फोडण्याचा प्रयत्न व **त्र्यबंकेश्वर रोड येथील एस.बी.आय. बँकेचे ए.टी.एम.** फोडण्याचा प्रयत्न **असे एकुण ३ गुन्हे** केल्याचे उघड झाले आहे.

मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र व परराज्यातील ए.टी.एम. फोडणाऱ्या व चोरणाऱ्या टोळ्यांची माहिती व त्यांची गुन्हे कार्यप्रणाली संकलीत करून त्यांच्यावर तात्रिक विश्लेषणाचा तसेच बातमीदारांच्या मदतीने माहिती घेवुन पिंपरी चिंचवड व पुणे शहर भागातील घडलेल्या गुन्ह्याचा तपास सुरू आहे. त्यासाठी पर राज्यात पथके पाठविण्यात आली आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदिप बिष्णोई, सह पोलीस आयुक्त श्री प्रकाश मुत्याल, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त श्री आर.आर.पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली एस.आय.टी. पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहा पोलीस निरीक्षक सतिश कांबळे, सहा.पोलीस निरीक्षक राम गोमारे, पोलीस उप निरीक्षक विजय जगदाळे, सपोफौ सुभाष सावंत तसेच पोलीस कर्मचारी मंगेश गायकवाड, सचिन असवले, सोमनाथ बोऱ्हाडे, कबीर पिंजारी, विशाल भोईर, महादेव जावळे, नितीन खेसे, पंकज भदाने, प्रविण पाटील, यांनी केली आहे.